# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११९ वा ❑ भारतीय सौर दिनांक २९ ज्येष्ठ शके १९४८, शुक्रवार दि.१९ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### वजन वाढविणारे भेसळयुक्त आयुर्वेदिक औषधांपासून सावधान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

वजन वाढवण्यासाठी घेतलेल्या बनावट किंवा भेसळयुक्त आयुर्वेदिक औषधांमुळे हिप जॉइंट (नितंबाचा सांधा) निकामी होण्याचा धोका संभवतो. याचे मुख्य कारण म्हणजे अशा औषधांमध्ये बेकायदेशीरपणे मिसळली जाणारी स्टेरॉईड्स () ही रासायनिक औषधे असतात.शुद्ध आणि अस्सल आयुर्वेदिक औषधांमुळे हा त्रास होत नाही, मात्र बाजारात मिळणाऱ्या काही अनधिकृत किंवा ''त्वरित वजन वाढवण्याचा'' दावा करणाऱ्या बनावट पावडरी आणि गोळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्टेरॉईड्स मिसळलेली असतात.

शुद्ध आणि अस्सल आयुर्वेदात वजन वाढवण्यासाठी अश्वगंधा किंवा शतावरी सारखी नैसर्गिक औषधे वापरली जातात, ज्यांचे असे गंभीर दुष्परिणाम होत नाहीत. मात्र, बाजारात मिळणाऱ्या काही बेकायदेशीर, विना-लेबल किंवा ''१० दिवसांत वजन वाढवा'' असा दावा करणाऱ्या बनावट गोळ्या किंवा पावडरींमध्ये डेक्सामिथासोन किंवा प्रेडनिसोन सारखे जड स्टेरॉइड्स मिसळले जातात.

वजन वाढविणाऱ्या पावडरमुळे तीन रुग्णांची हित जॉईंट निकामी झाल्याची बातमी नुकतीच समोर आली. वजन वाढविण्याचा दावा करणाऱ्या एका आयुर्वेदिक हेल्थ पावडर मुळे १८ ते २० वर्षे वयोगटातील तीन रुग्णांची हित जॉईंट गंभीरित्या खराब झाल्याचा धक्कादायक प्रकार नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात समोर आला आहे या तिन्ही रुग्णांवर ही जॉईंट रिप्लेसमेंट ची शस्त्रक्रिया करावी लागली असून संबंधित उत्पादनाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती नकळतपणे स्टेरॉईड्सयुक्त औषध दीर्घकाळ घेते, तेव्हा शरीरातील रक्तवाहिन्यांवर विपरीत परिणाम होतो. यामुळे हिप जॉइंटच्या हाडाला होणारा रक्ताचा पुरवठा खंडित होतो. रक्त न मिळाल्यामुळे ते हाड आतून सडू लागते आणि हळूहळू सांधा पूर्णपणे निकामी होतो. वैद्यकीय भाषेत या आजाराला अव्हॅस्कुलर नेक्रोसिस म्हणतात.

सध्याच्या तरुणाईमध्ये सुडौल आणि पिळदार शरीरयष्टी बनवण्याची प्रचंड क्रेझ आहे. सोशल मीडियावरील फिटनेस इन्फ्लुएन्सर्स आणि सेलिब्रिटीजच्या प्रभावामुळे तरुण-तरुणी जिम, व्यायाम आणि योग्य आहाराकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाले आहेत. मात्र, घाईगडबडीत वजन वाढवताना आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.मात्र याच मानसिकतेचा काही आयुर्वेदिक कंपन्या घेत आहे खूप वाढविणे कमजोरी दूर करणे आणि पचनक्रिया सुधारण्याचा दावा या आयुर्वेदिक कंपन्या करतात या उत्पादनाच्या जाहिरातींमध्ये अभिनेत्यांचे छायाचित्र देखील वापरण्यात येतात त्यामुळे तरुण याला बळी पडतात. आयुर्वेदाच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या अशा पावडर मध्ये नेमके कोणते घातक घटक किंवा अनधिकृत हिरोइन्स मिसळले जात आहेत का याचा थेट परिणाम हाडांवर होत आहे अशी शंका आता उपस्थित केली जात आहे अन्न व औषध प्रशासनाने तातडीने वजन वाढविणाऱ्या बोगस आयुर्वेदिक कंपन्यांची तपासणी करावी.

वजन खूप वाढविणाऱ्या आयुर्वेदिक पावडर व औषधांचा वापर करताना तरुणांनी योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा त्याचे शरीरावर व आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.अशा भेसळयुक्त औषधांमुळे शरीराचे कायमचे नुकसान होऊ शकते.किडनी आणि लिव्हर निकामी होणे.रक्तदाब आणि रक्तातील साखर वाढणे.हाडे ठिसूळ होणे .प्रतिकारशक्ती अत्यंत कमी होणे.आदी शारीरिक परिणाम दिसून येतात.

आठवडा किंवा १५ दिवसांत वजन वाढवण्याचा दावा करणारी औषधे १००% संशयास्पद असतात. पाकिटावर किंवा बाटलीवर घटकांची स्पष्ट नावे आणि किंवा चा परवाना क्रमांक नसतो गॅरंटीड वजन वाढवा अशा भडक जाहिरातींवर विश्वास ठेवू नये. वजन वाढवण्याचा सुरक्षित मार्गसंतुलित मार्ग म्हणजे आहारात केळी, दूध, सुका मेवा, अंडी, पनीर आणि डाळींचा समावेश करावा. नियमित व्यायाम करावा. वजन वाढवण्यासाठी जिममध्ये जाऊन वेट ट्रेनिंग करावा, ज्यामुळे स्नायू वाढतील. वजन वाढवण्यासाठी कोणत्याही जाहिरातीला बळी न पडता नोंदणीकृत आहारतज्ज्ञ किंवा आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# अधिकस्य अधिकं फलम्......राष्ट्र प्रथम!

## श्री. व सौ. खळदकर दांपत्याकडून अधिकमासातील अनोख्या दानकार्याचे सर्वत्र कौतुक

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – येथील श्री. जवाहर आणि सौ. कमला खळदकर या दांपत्याने आपल्या तिघी लेकींना अधिक महिन्यात अधिकमासाचे यथायोग्य वाण तर दिलेच आणि त्याचबरोबर एका अनोख्या पद्धतीनेही दानमाहात्म्य असलेला हा पुरूषोत्तममास साजरा केला.

सियाचीन मध्ये उभारण्यात येणा-या तिस-या ऑक्सिजन प्लांटसाठी आणि आपल्या सैनिक बांधवांसाठी श्री.व सौ. खळदकर यांनी अधिक मासानिमित्त रू.१,००,०००/- (रू.एक लाख) चा धनादेश संस्थेच्या सौ. अनुराधा कोटिभास्कर आणि श्रीमती सुमेधा चिथडे यांच्याकडे सुपूर्त केला आणि राष्ट्रकार्यात खारीचा वाटा उचलला.

अधिकस्य अधिकं फलम्...... अधिक मासात बाकी कशाचाही जास्त घाट न घालता ''राष्ट्र प्रथम'' द्वारे एक वेगळी दिशा आजच्या तरूण पिढीला त्यांनी दाखवली आहे. त्यांच्या या अभिमानास्पद राष्ट्रकार्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे आणि त्यातून अनेक जण प्रेरणा घेत स्वतःही या राष्ट्रकार्यात सहभागी होत आहेत.



या संस्थेचे अधिकृत ऑफिस हे पुण्यात सेनापती बापट रोडला आहे. तिथे त्यांची अपॉइंटमेंट घेऊन प्रत्यक्षही देणगी दिलेली चालते किंवा ऑनलाईन गुगल पे/ फोन पे अशा माध्यमातूनही देणगी देता येते ज्याची संस्थेकडून अधिकृत पावती दिली जाते.

साधी राहणी, उच्च विचारसरणी असलेल्या शिक्षकी पेशातील सुमेधा चिथडे आणि अनुराधा कोटिभास्कर ह्या दोघी संस्थेचे कार्य पाहतात.

आजकालच्या ग्रँड सेलेब्रेशन च्या शीर्षकाखाली होणा-या वाढदिवस/ लग्न/मुंज इत्यादी प्रसंगातील कुठला ना कुठला अनाठायी खर्च टाळून यथाशक्ति आपण किमान आपल्या राष्ट्रासाठी एवढे तर करूयात त्यातून आपल्या सैनिकांचे ''श्वास'' तरी वाचतील ज्यांच्यामुळे आपला देश सुरक्षित आहे. सेवा परमो धर्मः या तत्त्वाचा अवलंब करूयात.

१३ दिवस १३ घरी किंवा पहिल्या १३ जणांना भेटून या ऑक्सिजन प्लांट ची माहिती सांगून आरएसएस, सावरकर आणि समर्थ रामदास यांना आदर्श मानणा-या संस्थेच्या संचालिका सुमेधाताईंनी अक्षरशः पावनभिक्षा मागून या राष्ट्रकार्यासाठी निधीसंकलनास आरंभ केला आणि मग हळूहळू अनेक नागरिकांनी या कार्यात आर्थिक योगदान दिल्याने सियाचीनमध्ये सुमारे २.५ कोटीचा पहिला ऑक्सिजन प्लांट २०१९ ला उभारला गेला तसेच जम्मू काश्मीरमधील कूपवाडा येथे २०२२ मध्ये ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आला आहे. सध्या तिसरा ऑक्सिजन प्लांट सियाचीन येथे उभारण्यात येणार आहे ज्याचा खर्च सुमारे ३.५ कोटी आहे.

सैनिकांनाच मनुष्यरूपातील देव मानून त्यांच्या अतिबर्फाळ प्रदेशातील अस्तित्वासाठी, संघर्षांसाठी जी श्वासांची गरज आहे ती आपण भारतीयांनी पूर्ण करायलाच हवी जे सैनिक आपल्या भारतीयांसाठी अहोरात्र कार्यरत असतात.

ब-याच जणांनी या ऑक्सिजन प्लांट फंड कार्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यानिमित्ताने अनेकांनी प्रेरणा घेऊन या कार्यासाठी आर्थिक योगदान देण्याची तयारीही दर्शवली आणि खळदकर दांपत्याच्या या अधिकमासातील अनोख्या दानकार्याचे कौतुकही केले आहे.

इच्छुक व्यक्तींनी याबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी आणिकच राष्ट्रकार्यासाठी आर्थिक योगदान देण्यासाठी ७०५८१८१८८५ किंवा ७२४९१२२४३० या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# जेन झी तरुणांवर संघाचा पूर्ण विश्वास-सुनील आंबेकर

## पुणे श्रमिक पत्रकार संघात वार्तालाप; लोकसंख्या संतुलनाची गरज

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – ''देशाच्या नव्या म्हणजेच जेन झी पिढीबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रचंड आशावादी आहे. आजचे तरुण आपल्या परंपरा आणि भारताच्या गौरवाशी मनापासून जोडले गेले असून समाजात रचनात्मक बदलांसाठी मोठे योगदान देत आहे,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी पुणे येथे केले. नवी पेठेतील पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालापात ते बोलत होते.

या प्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रीजमोहन पाटील आणि सरचिटणीस मंगेश फल्ले उपस्थित होते.वार्तालापात आंबेकर यांनी संघाच्या शताब्दी वाटचालीबरोबरच संघाची नोंदणी, जेन झी तरुण, लोकसंख्या असंतुलन आणि मुस्लिम समाजाबाबत संघाची भूमिका स्पष्ट केली. कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनावर बोलताना सुनील आंबेकर म्हणाले, ''भारतात सर्वच स्तरांवर लोकशाही मार्गाने निवडणुका होतात.आपली न्यायालये, प्रशासन आणि प्रसारमाध्यमे स्वतंत्रपणे कार्यरत आहेत.अशा मजबूत लोकशाहीत जर कोणी आवाज उठवत असेल,तर त्याची योग्य दखल घेण्याची क्षमता व्यवस्थेत असायला हवी.त्यामुळे अशा आंदोलनांनी अचंबित होण्याची गरज नाही.''



**रा.स्व.संघाचे व्यवहार बँकेतूनच :**

संघाच्या नोंदणीसंदर्भात सध्या सुरू असलेल्या चर्चेवर सुनील आंबेकर यांनी संघाची भूमिका मांडली. ते म्हणाले, ''संघाच्या नोंदणीसंबंधी कोणताही कायदेशीर वाद नसून केवळ राजकीय फायद्यासाठी याविषयी संभ्रम निर्माण केला जात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही कायदेशीरदृष्ट्या मान्यताप्राप्त सामाजिक संघटन आहे. म्हणूनच आजवरच्या सरकारांनी विविध पातळ्यांवर संघाचे सहकार्य घेतले आहे. संघाच्या पथसंचलनांना पोलिसांची अधिकृत परवानगी मिळते, एवढेच नव्हे तर स्थानिक शाखांच्या नावाने बँकेत खातीही उघडली जातात.संघाचे सर्व आर्थिक व्यवहार केवळ बँकेच्या माध्यमातूनच चालतात.संघ शाखेच्या माध्यमातून रोजच समाजाप्रती उत्तरदायी आहे.''


**भारतीय मुस्लिमांनी इंडोनेशियाचा आदर्श घ्यावा**

मुस्लिम समाज आणि संघ यांच्यातील संबंधांविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आंबेकर म्हणाले,''संघाच्या स्थापनेपूर्वीपासूनच देशात हिंदू-मुस्लिम संघर्ष अस्तित्वात आहे. दुर्दैवाने, मुस्लिमांमध्ये धर्म बदलला म्हणजे राष्ट्र आणि इतिहास बदलतो अशी भावना निर्माण केली गेली आणि याच फुटीरतावादी मानसिकतेमुळे देशाची फाळणी ओढावली. हिंदू-मुस्लिमांचा हा वाद आता मिटायला हवा. सर्वांचा डीएनए एकच आहे.आता मुस्लिम समाजातूनही सामाजिक बदलांसाठी सकारात्मक पुढाकार घेतला जात असून,भारतीय मुस्लिमांनी पाकिस्तानकडे नव्हे, तर इंडोनेशियाच्या सांस्कृतिक आदर्शाकडे पाहिले पाहिजे.''

**लोकसंख्या नियंत्रणाबरोबरच संतुलनावर भर**

''सध्या युरोप आणि चीनसारख्या देशांनी आपल्या लोकसंख्या धोरणात यू-टर्न घेतला आहे. त्यामुळे भारताच्या संदर्भात लोकसंख्येचे संतुलन राखणे अधिक महत्त्वाचे आहे,'' असे मत सुनील आंबेकर यांनी व्यक्त केले.१९४७ मधील फाळणी ही डेमोग्राफिक (लोकसंख्याशास्त्रीय) बदलांमुळेच झाली होती, अशी आठवण करून देत ते म्हणाले, ''भविष्यात लोकसंख्येचे असंतुलन झाले,तर देशाची ओळख आणि संस्कृती टिकवणे कठीण होईल. त्यामुळे हिंदू संस्कृतीला मानणाऱ्या लोकांची बहुलता देशाच्या प्रत्येक भागात असायला हवी.लोकसंख्या संतुलनाच्या उपायांबाबत सरसंघचालकांनी कोणतीही सक्ती किंवा ऑर्डर दिलेली नाही; तर प्रत्येक परिवाराची परिस्थिती आणि गरज लक्षात घेऊन याकडे पाहिले पाहिजे, हीच संघाची सांस्कृतिक भूमिका आहे.''



## जात्यावरच्या ओव्या......

आल भरून आभाळ
आता बसणार पाणी
कणसा भरताच दाणे
पाखर गातील गाणी ||७००||

अरे पड ना पाण्या
नको लावू वाट पाह्या
झाल्या तपून उन्हान
दगडधोंड्याच्या लाह्या ||७०१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४०

ज्योतिर्मय साहित्य


**मना पाविजे सर्वही सुख जेथे ।**
**अती आदरे ठेविजे लक्ष तेथे ।**
**विवेके कुडी कल्पना पालटीजे ।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे ।४०।**

अर्थ : समर्थ आपल्या मनाला सांगतात की हे मना, सर्व सुखे जिथे प्राप्त होतात अशा त्या परमेश्वराकडे अतीव अशा आदराने आपले लक्ष केंद्रित कर. योग्य अयोग्यतेचा विचार करून वाईट विचारांचा/कल्पनांचा त्याग कर आणि राघवाच्या ठिकाणी आपले मन असू दे.

विवेचन : आधीच्या श्लोकात आपण पाहिले की सुखाची आणि समाधानाची प्रत्येकाची कल्पना वेगवेगळी असते. कोणाला पैसा हवा असतो, कोणाला यश तर कोणाला कीर्ती तर कोणाला आणखी काही... माणूस क्षणिक मोहाला बळी पडतो आणि त्या सुखाच्या मागे धावतो परंतु अंतिमतः सुखाऐवजी दुःखच पदरात पडते. क्षणकाल टिकणाऱ्या सुखासाठी आपण फार मोठी किंमत मोजून दुःख पदरात घेतो.



काम, क्रोध, लोभ, मोह यासारख्या विकारांनी मन दूषित होते. असे मन आणखी वाईट विचारांना जन्म देते. माणसाची दिवसेंदिवस अधोगती होत जाते. ज्याप्रमाणे गढूळ पाण्यात आपल्याला प्रतिबिंब दिसत नाही तसेच नाना प्रकारच्या विकारांनी दूषित झालेल्या मनात भगवंताचे प्रतिबिंब पडणे शक्य नसते. म्हणूनच अशा वाईट विचारांचा विवेकपूर्वक त्याग करणे आवश्यक असते. कुडी कल्पना म्हणजे वाईट विचार. ज्या गोष्टी किंवा जे विचार भगवंतापासन दूर नेतात,




त्या सगळ्या गोष्टी म्हणजे कुडी कल्पना असे म्हणता येईल. म्हणून तर ''सदाचार हा थोर सांडू नये तो, जनी तोचि तो मानवी धन्य होतो'' हे समर्थांनी सुरुवातीलाच आपल्याला सांगितले आहे.

एखाद्या विद्वत् सभेत जर विद्वानांना एखाद्या विषयावर त्यांचे मत विचारले तर प्रत्येकाची वेगवेगळी मते येतील. तात्पर्य त्यांच्यामध्ये एकाच विषयावर एकवाक्यता नसते. पण जर सर्व खऱ्या संतांचा ( भोंदू बाबा नव्हे) मेळा भरला आणि त्यांना जर अंतिम सुख आणि समाधान कशात आहे हे विचारले तर त्या विषयावर त्यांचे एकमत होईल, एकवाक्यता असेल आणि एका सुरात ''भगवंत'' असेच उत्तर त्यांच्याकडून येईल.

संत हे ईश्वराचे प्रतिनिधी असतात नव्हे ईश्वर स्वरूपच असतात. परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग ते आपल्याला दाखवतात. त्यांना लोकांच्या कल्याणाची तळमळ असते. जर अशा सर्व संतांचे अंतिम समाधान हे भगवंताच्या ठायी आहे असे एकमत असेल तर आपण ते का स्वीकारू नये ?

(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ सेवा

कोणत्याही प्रकारची सेवा हे पुण्यकर्म आहे, सेवेचे मोल सर्वश्रेष्ठ आहे, सेवा कधीच व्यर्थ जात नाही जशी सेवा तसाच मोबदलाही मिळतोच, म्हणून सेवेला प्राधान्य द्यावे सेवेचे फळ नेहमी गोडच असते.

## गीता ही सर्व ग्रंथांची आई आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवद्गीता ही सर्व ग्रंथांची आई आहे. गीता ही वेदांपेक्षा श्रेष्ठ आहे. वेद हे देवाच्या निःश्वासातून निघाले, तर गीता ही त्याच्या मुखातून निघाली. गीतेचा विषय कोणता ? गीतेचा विषय म्हणजे मोहाचा नाश करण्याचे तत्त्वदृष्ट्या आणि साधनदृष्ट्या विवेचन, हा होय. गीतेची सुरुवात म्हणजे अर्जुनाला मोह झाला; याचा अर्थ असा की, त्याला कर्तेपणाच्या अभिमानाने असमाधान उत्पन्न झाले, आणि त्यामुळे काय करावे आणि काय न करावे याची शंका त्याला उत्पन्न झाली. गीतेचा शेवट म्हणजे अर्जुनाचा मोह नाश पावला; याचा अर्थ असा की, कर्ता परमात्मा आहे हे निश्चित झाल्यामुळे जीवाच्या कर्माचे सुखदुःख संपले. खरोखर, गीतेचे रहस्य सांगावे ज्ञानेश्वरमहाराजांनीच. भारतीय युद्धामध्ये परमात्मा पीतांबर नेसून, अर्जुनाच्या रथावर बसून, रणांगणावर अर्जुनाला गीता सांगते झाले. पुढे हजारो वर्षांनी, भगवंत कपडे बदलून आले आणि त्यांनी ज्ञानेश्वरी सांगितली. ज्ञानेश्वरी ही भगवंताची वाणी होय. त्यात सांगितल्याप्रमाणे आपण आचरण करावे. ' मी मागे आहे, तू पुढे चल. ' हेच भगवंतांनी आपणा सर्वांना सांगितले आहे.

एखादी उपवर झालेली मुलगी जर आपल्या मैत्रिणीच्या लग्नाला गेली, तर तो समारंभ पाहून तिच्या मनामध्ये स्वतःच्या लग्नाचे आणि त्यातल्या सोहळ्याचे विचार येतील; त्याचप्रमाणे, आपण पोथी ऐकत असताना त्यामध्ये वर्णन केलेल्या अवस्था आपल्याला कशा येतील याचा विचार करावा. आत्मनिवेदन म्हणजे मी कोण आहे हे कळणे होय. प्रारब्धाच्या गतीने देहाला जी सुखदुःखे भोगावी लागतात, त्यांमध्ये आपण असल्यासारखे दिसावे, पण खरे मात्र नसावे. अशिलाचा खटला स्वतःचाच आहे असे समजून वकील कोर्टामध्ये भांडतो, पण खटल्याचा निकाल कसाही लागला तरी त्याचे सुखदुःख मानीत नाही, वरून मात्र अशिलाजवळ दुःख दाखवितो; अगदी असाच व्यवहार मी करतो. व्यवहार सत्य मानणाऱ्या लोकांत वावरायचे असेल, तर बाहेरून त्यांच्यासारखे वागणे जरूर आहे. असे वागत असताना आपले भगवंताचे अनुसंधान चुकू न दिले की व्यवहार हा खेळ बनतो. कधी हार तर कधी जीत ! खेळात आपण हरलो काय आणि जिंकलो काय, खऱ्या जीवनाच्या दृष्टीने सारखेच. तरी खेळ खेळताना मात्र तो जिंकण्याचा चांगला प्रयत्न करावा. भगवंताचे नाम घेतले की ही युक्ती आपोआप साधते. म्हणून रात्रंदिवस माझ्या माणसांना मी सांगतो की, वाटेल ते झाले तरी भगवंताचे नाम सोडू नका.

भगवंताच्या इच्छेने सर्व घडत आहे, ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे गीतेचे सार आहे.

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

♦ अविद्या

पुढे......

विद्यां चाविद्याच यस्त द्वेदो भयँ सह/
अविद्यया मृत्यूं तिर्त्वा
विद्ययां~मृतमश्रुते//

जो मनुष्य ज्ञानतत्त्व व अज्ञान कर्म या दोन्हींना यथार्थपणे जाणतो, तो कर्तव्यकर्माचे अनुष्ठानने मृत्यूला पार करून ज्ञानाच्या अनुष्ठानाने अमृताची म्हणजे परमेश्वराची प्राप्ती करतो.

जो ज्ञाता सर्व जग स्वतःमध्ये पाहतो, तसेच सर्व जगात आपल्याला पाहतो, तो कशाचाच तिरस्कार करीत नाही. तेव्हा त्याला शोक व मोह कसा असणार? केवळ कर्म (अविद्या) किंवा केवळ ज्ञान (विद्या) यांच्याद्वारे सर्वोच्च श्रेयस प्राप्त होऊ शकत नाही त्यासाठी दोन्हीचा समुच्चय असणे आवश्यक आहे.

वरील श्लोकाच्या भावार्थावरून ज्ञान म्हणजेच विद्या किंवा ब्रह्मविद्या होय हे लक्षात येते.

▪ अविद्या : भोगाच्या प्राप्तीसाठी साधन रूप कर्मांचे अनुष्ठान म्हणजेअविद्या होय वेद उपनिषदा प्रमाणे, अविद्या म्हणजे केवळ माहीत नसणे ,असे नसून सत्याचे विपरीत ज्ञान म्हणजे अविद्या आहे अविद्येचा रस्ता हा विघटनाचा असतो. यात दुःख, अंधकार, मोह शोक हे भरलेले असतात.

वेदांतानुसार अविद्या ही मायेचाच एक भाग आहे जी जीवाला सत्य विसरायला लावते आणि असत्याशी आसक्त ठेवते. क्रमशः.....




### स्रीशक्ती आणि तरंग

पौराणिक काळापासून,राजमाता जिजाऊ ते झाशीची राणी लक्ष्मीबाई पर्यंत स्रीशक्तीचा आदर व पुजा होत गेली हे आपण पाहतोच श्रीकृष्ण वा रामराज्यातही स्री आदीमाया व रमा, लक्ष्मी पार्वती व पंचकन्यांना आदर होता. आज सुद्धा सुख दुःख संसार व घरदार येथे स्रीला स्थान आहे. कारण एकटा माणूस कधीच सुखी वा दुखी होत नाही. म्हणून समाजात वा सर्व क्षेत्रात महिलाचा आदर होतो का नाही हे पाहणे महत्वाचे आहे, असे मला वाटते. आजही आरक्षण दिले म्हणजे सर्वत्र "ऑलवेल" आहे असे नाही. उबंरठ्याच्या आत व बाहेरही माताबहिणीचा संघर्ष चालू आहे. असुरक्षीततेची भावना कायम आहे! महिला म्हणजे यंत्र नाही. त्यामुळे कधी असमतोल बनतो तालतंत्र बिघडून कौर्याला जागा मिळते.नीतीमुल्ये, सहकार्य नात्याची सुवर्णरेखा आणि भावनांचा चंगलवाद
याचा अतिरेक होऊ न दिला तर स्री घरात, समाजात, बाहेर सुरक्षित राहतील त्यासाठी समानता व मुल्ये जपा. आज शिक्षीत स्री सर्वत्र काम करत आहे. ती सबला झाली आहे. तेव्हा सुखदुःखाचे चटके व तरंग समतोल राहतील हे कटाक्षाने पाहिले
पाहिजे. आज एवढे मातृशक्तीचे महत्व सांगून थांबतो. मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे वाचत राहा.




## शिंक आरोग्यास उपयुक्त असते

ज्योतिर्मय साहित्य

न सांगता, न थांबवता येणारी शिंक ही आरोग्यास फारच उपयुक्त आहे.

१) शिंकेमुळे ह्रदयाकडून मेंदुकडे व पोटाकडे अचानक जोराचा दाब दिला जातो, या दाबामुळे सर्वांगातील रक्तदाब जोराने झटका देऊन ढकलला जातो. याचा चांगला परिणाम रक्त प्रवाहावर होऊन रक्त वाहिन्या चांगल्या प्रकारे कार्यान्वित होतात व डोके हलके होते.

२) पुर्वी लोक शिंका येण्यासाठी नाकात तपकीर ओढून कृत्रिम प्रकारे शिंका आणत होते व डोके हलके करत होते.

३) आता शिंक येणे चुकीचे समजून लोक सॉरी म्हणतात, पण ती नैसर्गिक क्रीया आहे.

४) दैनंदीन जीवनात ह्रदयविकाराचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये कमी आहे, कारण स्त्रिया स्वयंपाक करतेवेळी किंवा घराची साफ सफाई करतेवेळी शिंकण्याचे कार्य सतत करत असतात. मात्र ज्या स्रियांचे शिंकण्याचे प्रमाण कमी आहे, त्यांची तब्येत अकारण स्थूल होते. शिंकेमुळे पोटावर प्रचंड दाब येतो व पोटाचे स्नायू आकुंचित केले जातात व त्यामुळे कपालभातीचा योग पूर्ण होतो.

५) नित्य नियमाने सकाळी उठल्यावर व रात्री झोपताना या दोन वेळेस शिंक येण्यासाठी उपाय केले तर शरीर सतत निरोगी तर राहतेच शिवाय पोटाचे व डोक्याचे दुखणे कायमचे बंद होते.

६) कृत्रिम शिंका येणेसाठी नाकात स्वच्छ धागा फिरवला तर शिंका सहज येतात, ह्यासाठी तपकीर वापरण्याची गरज नाही.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

७) शिंकेमुळे नाक व घसा सतत स्वच्छ राहतो, तसेच मनातील ताणतणाव कमी होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्रदयविकार होऊ नये ह्यावर देखील हा रामबाण उपाय आहे. निसर्ग उपचार पद्धती मध्ये ही क्रिया दिलेली आहे.

८) अभ्यास करतांना झोप येत असेल तरीही शिंका काढल्यास पुढील दोन तास डोके तरतरीत राहते व झोप येणे थांबते.

९) शिंकेमुळे चेहरा थोडासा लालसर होतो व डोळ्यात पाणी येते हे सुध्दा आरोग्यवर्धक आहे. चेहरा उजळतो व डोळे स्वच्छ होतात.

१०) शिंकेमुळे डोक्यातील विचार चक्र खंडित होते व पुन्हा नविन विचारचक्र सुरू होतांना मेंदुला नवचैतन्य निर्माण होते.

११) सतत सर्दी होत असेल तर ती शिंकांमुळे. काही काळाने अशी सततची सर्दी थांबते.

१२) अशा अनेक उपयुक्त बाबींशी शिंकांचा संबध आहे. अचानक येणारी व थांबवता न येणारी शिंक ही सजीवास ईश्वरी देणगीच आहे.

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

भावपुष्प

शब्दा शब्दांची अलवार
सुंदर,छान माळेत
भावपुष्प मनातले गुंफते
साधी सोपी रचना
शब्द मऊ मखमली
वाचताना मन आनंदते

हळव्या,कोमल मनाने
नित्य नियमाने देवास
भावपुष्प अर्पण करते
चरणी डोके ठेवून
नतमस्तक उभे राहूनी
मनोभावे प्रभुस वंदिते

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत



दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे पाच वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पिंपळे सौदागर : मिश्किल - विनोदी कविता, भक्तीगीत, जोगवा आणि पाऊस गीतांच्या सादरीकरणाने येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ सदस्य शशिकांत कुलकर्णी, माधुरी मुलमुले आणि माधुरी कुलकर्णी यांच्याहस्ते दिपप्रज्वलन तसेच ज्ञानेश्वर माऊलींचे प्रतिमा पुजन करण्यात आले. त्यानंतर विजया तारे, आरती किणगी, रेणुका कुलकर्णी, माधुरी मुलमुले, सुरेखा कुलकर्णी, अनुराधा निलेगावकर, शशिकांत कुलकर्णी, शशांक खांडेकर, शैलजा लोकरस, विनिता देशपांडे, अनघा वडनेरकर, जयंत चौधरी, उषा भागवत, प्रमिला देशपांडे, मीनाक्षी कुलकर्णी आदिंनी कलागुण सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनुराधा निलेगावकर यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी गौरी फडके आणि स्नेहा चिंचवडकर यांनी सांभाळली. अध्यक्षीय समारोप विलास जोशी यांनी केला. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.



# इकडे आड तिकडे विहीर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

लग्न....... किती सुंदर संकल्पना आहे ना ....!आपली कुटुंबव्यवस्था, संस्कृती लग्न या संकल्पनेवर टिकून आहे लग्न ही भारतातील कुटुंब व्यवस्थेची बुनियाद आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. लग्नामध्ये दोन जीवांचे मिलन होत नसून दोन कुटुंबाचेही मिलन होत असते. नकळत घेतलेल्या जबाबदाऱ्या असतात, असंख्य तडजोडी असतात आणि काही गोड रेशीमगाठी ही. लग्न या गोष्टीबद्दल मिश्र प्रतिक्रिया समाजात पाहायला मिळतात. म्हणजे बघा ...

शादी का लड्डू जो खाये वो भी पछताये...
शादी का लड्डू जो ना खाये वो भी पछताये.....

असे म्हटले जाते पण या ओळींमध्ये थोडा बदल करावासा वाटतो.

शादी निभाये वो भी पछताये...
और जो तलाक ले ले वो भी पछताये ...



अशी स्थिती झाली आहे.

लग्नामध्ये करावी लागणारी तडजोड करायला आजची पिढी बिलकुल तयार नाही .आम्ही स्वावलंबी आहोत, मग का तडजोड करावी . आम्ही स्वतःच्या मर्जीने जगू , तडजोड करावेच लागणार असेल तर नको आम्हाला पार्टनर .आम्ही समर्थ आहोत स्वतःची काळजी घ्यायला .असे विचार ऐकण्यात येतात थोडी जरी अनबन झाली, मतभेद झाले की लगेच घटस्फोटापर्यंत गोष्टी जातात . संसारात एकाने विस्कटले की दुसऱ्याने सावरायचे असते पण इथे दोघेही विस्कटायला आतुर असतात.. प्रत्येकाचा स्वाभिमान नात्यांपेक्षा मोठाअसतो. मग काय घटस्फोटासाठी अर्ज..... मुलांच्या भविष्याचा विचार नाही.... भावनिक गुंतवणुकीचा विचार नाही.... तडक निर्णय घेऊन मोकळे. हा पण आर्थिक बाबींचा चोख हिशोब लावला जातो. कमवत्या व्यक्तीने आपल्या पार्टनरला आपल्या कमाईतील काही भाग पोटगीच्या स्वरूपात दिले पाहिजे. त्यानंतर सुरू होतो खरा खेळ. पोटगी देणाऱ्या व्यक्तीची अवस्था इकडे आड आणि तिकडे विहीर. एकत्र राहूही शकत नाही आणि घटस्फोट घेतले की येणारा आर्थिक ताण... मनस्ताप, भावनिक दृष्ट्या झालेले नुकसान तर वेगळेच .... यामुळे येणाऱ्या काही दिवसात लग्नही संकल्पना नष्ट होते की काय अशी भीती वाटू लागली आहे.




एकटे राहणे वाईट नाही पण त्याचा विचार कोणाच्या तरी आयुष्यात जाण्याआधी झाला पाहिजे, आजची तरुण पिढी बदलली आहे. त्यांचे विचार स्पष्ट आहेत. मला शारीरिक आणि भावनिक गरजांसाठी पार्टनर हवा पण लग्नात अडकायचे नाही जबाबदारीत अडकायचे नाही. लिव्ह इन मध्ये राहूया. तुझे खर्च तू उचलायचे आणि माझे मी. **(क्रमशः)**

# युवा शाहीर प्रा. प्रवीण जाधव यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - भारतीय संगीत नृत्य-नाट्य आणि लोककला क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या संगीत नाटक अकादमीच्या २०२४-२५ च्या उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगरचे युवा शिवशाहीर प्रा. प्रवीण जाधव यांची निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील लोकसंगीतासाठी योगदान दिल्याबद्दल त्यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. २५ हजार रुपये, ताम्रपट आणि मानाची शॉल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सध्या प्रवीण जाधव पंचवटी, नाशिक येथे नाट्यशास्त्र विभागात अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असून, लोककला जतन आणि संवर्धनासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवशाहीर सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शाहिरी व लोककलेचे धडे घेतले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन येथे नाट्यशास्त्र विभागात पीसीसी इन डिप्लोमा सर्टिफिकेट कोर्स डॉ. राजू सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातून डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मास्टर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स एमपीएचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मुंबई विद्यापीठात डॉ. प्रकाश खांडगे व डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पीजी इन फोक आर्टस् हा अभ्यासक्रम पूर्ण केला. सध्या शाहिरी विषयातून डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्डी सुरू आहे.

## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....




तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



# गोपाळ गणेश आगरकर

## एक दुर्लक्षित समाज सुधारक

(आगरकर २४ जुलै-१८५६-१७ जुन१८९५)

✍मोहिनी किन्हीकर हेडावू मो. 98229 40912

कालच्या अंकावरून पुढे.....

रघुनाथ कर्वे ह्यांना प्रेरणा महर्षी कर्वे व काही पाश्चात्त्य विचारवंत असले तरीही आगरकरांनी मांडलेले स्त्री स्वातंत्र्य व स्त्री पुरुष समानता ही दोन मूल्ये देखील त्यांनी त्यांच्याकडून आत्मसात केली होती.

पुणे जेवढे उदार मतवाद्यांचे शहर तेवढेच किंबुहना जास्त जास्तकर्मठ लोकांचे.!

आगरकरांचे काळाच्या पुढे असणारे, द्रश्टे विचार समाजाला पटले नाही .त्यांची त्यांच्या हयातीतच सनातन्यांनी प्रेत यात्रा काढली होती,.. एवढे अपमान, शल्य कोणालाच झाले नसेल..

राजकीय सुधारणे करिता समाजाला एकत्र करून परिकीयांशी लढायचे होते, ते त्यामानाने सोपे होते,कारण शत्रू हा परकीय होतं. परंतु आगरकरांच्या काम महाकाठीण,! कारण शत्रू कोणी परका नसून कर्मठ समाजच होता,आणि त्याविरुद्ध लढणे म्हणजे स्वकियांशी लढणे,हेच काम आगरकरांनी केले.

आगरकरांच्या लेखना संबधी टिळक लिहितात, "देशी वर्तमानपत्रात हल्ली जर काही महत्त्व आले असेल तर ते बऱ्याच अंशी आगरकर ह्यांच्या विदवत्तेचे व मर्मिकातेचे फळं होय, ह्यात शंका नाही."

(संदर्भ..लोकमान्य टिळक चरित्र.. न.ची.केळकर)

वाक्य मीमांसा आणि वाक्याचे पृथ्करण, वाक्य विश्लेषण. आणि सुधराकतील निवडक निबंध ही आगरकरांनी लिहीलेली पुस्तके होत.

त्यांच्या कामात लोकांनी फारशी साथ दिली नाही तसेच.त्यांच्या प्रकृतीने त्यांना फारशी साथ दिली नाही. त्यांना रक्तक्षयाचा त्रास होता. मृत्यपूर्वी त्यांना टिळकांशी भेटून मतभेद मिटवायाची इच्छा होती. त्याच्या इच्छेमुळे, टिळक त्यांना भेटले, त्यांच्याशी बोलले आणि मरताना दोघांची मैत्री कायम होती.त्यांच्या वयाच्या केवळ 39 व्या वर्षी निधन झाले व महाराष्ट्र एका मोठ्या दृष्ट्या समाजसुधारकाला मुकला.

आगरक आपला जिवलग मित्र गेल्यावर टिळकना अतीव दुःख झाले. त्यांनी केसारितून भावपूर्ण लेख लिहून श्रद्धांजली दिली. त्यांच्यावरील मृत्यलेख लिहिताना टिळक घाळघळ रडत होते व केसरी दोन कॉलम चा लेख लिहायला त्यांना चार तासाहून जास्त वेळ लागला. ते लिहितात "मृत्यूच्या उग्र स्वरूपा पुढं बारीक सारीक मतभेदाच्या गोष्टी आपण विसरून गेलो व जुन्या आठवणी जागृत होऊन बुध्दी व लेखणी गोंधळून गेली. आगरकर हे मूळचे गरीब परिस्थितीत असताना त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग द्रव्य न मिळवता समाजाचे ऋण फेडण्याकरिता केला या गोष्टीला महत्व आहे.".... एका मोठ्या माणसाला समजायला तेवढ्याच ताकदीचा मोठा माणूस लागतो, हे ही तेवढेच खरे. ■ ■ ■

# 'नक्षत्रांचे देणे'





© अपर्णा परांजपे, कात्रज पुणे

## आत्मसाक्षात्कार व्हावा प्रकृतीचा खेळ कळावा.. (दिनविशेष क्रमशः)

शुक्रवार, १९ जून २०२६ (निज ज्येष्ठ शुक्ल पक्ष) चे पंचांग पुढीलप्रमाणे
दिनविशेष शुक्रवार, १९ जून २०२६
वार : शुक्रवार, मास : निज ज्येष्ठ
पक्ष : शुक्ल, तिथी : शुक्ल पंचमी
नक्षत्र : आश्लेषा (बहुतांश दिवस), नंतर मघा
चंद्रराशी : कर्क (नंतर सिंह राशीत प्रवेश)
योग : हर्षण (पंचांगभेदानुसार वेळेत किंचित फरक असू शकतो)

शुक्ल पंचमी ही विद्या, अध्ययन, जप, पूजन व शुभ कार्यांसाठी अनुकूल मानली जाते.

पुनर्वसुस्तथा पुष्य "आश्लेषाऽ"थ महाबला ॥ २॥
नक्षत्रमातरो ह्येताः प्रभामालाविभूषिताः ।
(शिवार्चनपरा नित्यं शिवध्यानैकमानसाः ।
शान्तिं कुर्वन्तु मे नित्यं सर्वकालं शुभोदयाः )

आश्लेषा नक्षत्र अंतर्मुख चिंतन, आत्मपरीक्षण, मंत्रजप आणि उपासनेसाठी उपयुक्त मानले जाते.

आश्लेषेनंतर मघा नक्षत्र सुरू होते. मघा हे पितृस्मरण, कुलधर्म आणि परंपरेचा सन्मान यांच्याशी संबंधित नक्षत्र मानले जाते.

सत्सङ्गत्वे निस्सङ्गत्वं निस्सङ्गत्वे निर्मोहत्वम् ।
निर्मोहत्वे निश्चलतत्त्वं निश्चलतत्त्वे जीवन्मुक्तिः ॥

सत्संगातून आसक्ती कमी होते, आसक्ती कमी झाल्यावर मोह नष्ट होतो; मोह नष्ट झाल्यावर सत्याचे स्थिर ज्ञान प्राप्त होते आणि त्यातून जीवन्मुक्तीचा मार्ग खुला होतो.

"आत्मपरीक्षण, नामस्मरण आणि गुरुस्मरण यांमुळे अंतःकरण शुद्ध होते."

॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥

भावले ते लिहिले..
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏
© अपर्णा परांजपे कात्रज पुणे




## आधुनिक शेतीमध्ये वनस्पति संप्रेरकांचा वापर: भरघोस उत्पादनाची गुरुकिल्ली

आजच्या आधुनिक आणि तांत्रिक शेतीमध्ये कमी खर्चात जास्त आणि दर्जेदार उत्पादन घेणे हे प्रत्येक शेतकऱ्याचे ध्येय असते. शेतीमध्ये खते आणि पाण्याचे नियोजन जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच वनस्पतींच्या अंतर्गत वाढीवर नियंत्रण ठेवणाऱ्या संप्रेरकांचा (Plant Hormones / Growth Regulators) योग्य वापर करणेही गरजेचे झाले आहे.

वनस्पतींमध्ये नैसर्गिकरीत्या संप्रेरके तयार होत असतात, परंतु बाह्य घटकांमुळे किंवा हवामानातील बदलांमुळे अनेकदा वनस्पतींची वाढ योग्य प्रमाणात होत नाही. अशा वेळी कृत्रिम संप्रेरकांचा योग्य वापर करून आपण पिकांचे उत्पादन दुप्पट करू शकतो.

♦ शेतीमध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी संप्रेरके आणि त्यांचे कार्य:

■ कृषी शास्त्रानुसार वनस्पती संप्रेरकांचे प्रामुख्याने दोन गट पडतात: वाढ वाढवणारे आणि वाढ रोखणारे

१. जिबरेलिक ॲसिड (GA3)
हे शेतीमध्ये सर्वाधिक वापरले जाणारे संप्रेरक आहे.
■ कार्य: पेशींचे विभाजन करणे, फळांचा आणि फुलांचा आकार वाढवणे.
■ उपयोग: द्राक्ष, मोसंबी, आणि भाजीपाला पिकांमध्ये फळांचा आकार आणि लांबी वाढवण्यासाठी याचा प्रामुख्याने वापर होतो. बियांची सुप्त अवस्था (Dormancy) तोडून जलद उगवण करण्यासाठीही हे उपयुक्त आहे.

२. ऑक्सिन्स (Auxins - NAA, IAA)
■ कार्य: वनस्पतींच्या मुळांची वाढ करणे आणि फुलगळ-फळगळ रोखणे.
■ उपयोग: कापूस, मिरची, टोमॅटो आणि फळबागांमध्ये नेफ्थलीन ॲसेटिक ॲसिड (NAA - मार्केटमध्ये 'प्लॅनोफिक्स' नावाने मिळते) चा वापर फुलांची आणि फळांची गळती रोखण्यासाठी केला जातो. तसेच कलमे करताना मुळे लवकर फुटण्यासाठी आयबीए (IBA) चा वापर होतो.

३. सायटोकायनिन्स (Cytokinins)
■ कार्य: वनस्पतींमध्ये नवीन फुटवे (Branches) आणणे आणि पानांचे आयुष्य वाढवणे.
■ उपयोग: पिकांना जास्त फांद्या फुटण्यासाठी आणि फुलधारणा जास्त होण्यासाठी याचा उपयोग होतो. यामुळे पिकांमध्ये हिरवेपणा टिकून राहतो.

४. इथिलीन (Ethylene)
■ कार्य: फळे पिकवणे आणि झाडांची पाने पिवळी करून गळण्यास मदत करणे. क्रमशः...

# मराठवाड्यातील मराठी कविता : २००० नंतरचे प्रवाह

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठवाडा हा संतपरंपरा, लोकसंस्कृती, ग्रामीण जीवन आणि विद्रोही साहित्याचा समृद्ध वारसा लाभलेला प्रदेश आहे. आधुनिक मराठी साहित्याच्या विकासात मराठवाड्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण, दलित, बहुजन आणि सामाजिक परिवर्तनवादी साहित्यचळवळींची उगमभूमी म्हणूनही मराठवाड्याचा उल्लेख केला जातो.

सन २००० नंतरच्या काळात जागतिकीकरण, उदारीकरण, तंत्रज्ञान क्रांती, शेतीचे प्रश्न, दुष्काळ, स्थलांतर, सामाजिक विषमता, स्त्री-अस्मिता आणि पर्यावरणीय संकटे यांचा परिणाम मराठवाड्यातील कवितेवर प्रकर्षाने दिसून येतो. त्यामुळे या काळातील कविता केवळ भावकविता न राहता सामाजिक वास्तवाचा दस्तऐवज बनली आहे.

**१. समकालीन वास्तवाची कविता**

२००० नंतरच्या मराठवाड्यातील कवितेने बदलत्या समाजव्यवस्थेचे भान जपले. शेतकरी आत्महत्या, पाणीटंचाई, बेरोजगारी, ग्रामीण अर्थव्यवस्थेची पडझड आणि स्थलांतर या प्रश्नांनी कवितेला नवे आशय दिले. मराठवाड्यातील दुष्काळ हा केवळ भौगोलिक प्रश्न नसून मानवी वेदनेचा अनुभव आहे. त्यामुळे अनेक कवींनी शेतकरी आणि ग्रामीण जीवनाच्या संघर्षाला आपल्या कवितेचा केंद्रबिंदू बनविले.

**२. दलित, बहुजन आणि विद्रोही संवेदना**

मराठवाडा हा दलित साहित्याच्या प्रभावी परंपरेचा प्रदेश आहे. २००० नंतरची कविता सामाजिक न्याय, समता, जातीय विषमता आणि मानवी प्रतिष्ठा यांसाठी अधिक आक्रमकपणे




व्यक्त होताना दिसते. विद्रोह, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि परिवर्तनाची आकांक्षा ही या कवितेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. दलित आणि बहुजन कवींच्या लेखनामुळे समकालीन कवितेला व्यापक सामाजिक आशय प्राप्त झाला आहे.

**३. स्त्री-अनुभवांचे नवे परिमाण**

या काळातील कवितेत स्त्रीचे जग अधिक व्यापक स्वरूपात व्यक्त झाले आहे. घर, कुटुंब, नातेसंबंध यांच्याबरोबरच स्त्रीची स्वतंत्र ओळख, स्वातंत्र्य, अस्मिता, लैंगिक भेदभाव आणि सामाजिक बंधने यांवरही भाष्य केले गेले. स्त्री-कवयित्रींच्या लेखनातून संवेदनशीलता आणि प्रतिकार यांचा सुंदर संगम दिसून येतो.

**४. लोकभाषा आणि बोलीचे सौंदर्य**

मराठवाड्याची बोलीभाषा ही येथील कवितेची मोठी ताकद आहे. ग्रामीण जीवनातील प्रतिमा, लोकपरंपरा, म्हणी, वाक्प्रचार आणि स्थानिक शब्दसंपदा यांचा प्रभावी वापर समकालीन कवितेत दिसतो. त्यामुळे कविता अधिक जिवंत, वास्तववादी आणि लोकाभिमुख बनली आहे. मराठवाड्याची बोली ही स्वतंत्र सांस्कृतिक ओळख जपणारी भाषा असल्याचे अनेक अभ्यासकांनी अधोरेखित केले आहे.

**५. जागतिकीकरण आणि नवमाध्यमांचा प्रभाव**

मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे कवितेच्या अभिव्यक्तीला नवे व्यासपीठ मिळाले. फेसबुक, ब्लॉग, युट्युब आणि ऑनलाइन साहित्य मंचांवरून अनेक नवोदित कवी पुढे आले. कवितेचे वाचन, सादरीकरण आणि प्रसार अधिक व्यापक झाला. त्यामुळे कविता लोकांपर्यंत जलद गतीने पोहोचू लागली.

**६. निसर्ग, पर्यावरण आणि मानवी अस्तित्व**

दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि पर्यावरणीय असंतुलन हे मराठवाड्याच्या जीवनाशी निगडित प्रश्न आहेत. त्यामुळे या काळातील कवितेत निसर्ग केवळ सौंदर्याचा विषय न राहता अस्तित्वाचा प्रश्न बनतो. पर्यावरणीय संकटांविषयीची चिंता आणि संवेदनशीलता या कवितेत स्पष्टपणे जाणवते.

**प्रमुख कवी आणि योगदान**

२००० नंतरच्या मराठवाड्यातील कवितेच्या प्रवाहात फ. म. शहाजिंदे, भारत सासणे, डॉ. सुधीर गव्हाणे , इंद्रजित भालेराव, अनुराधाताई पाटील, लक्ष्मीकांत तांबोळी, विवेक जोशी, संजीवनी तडेगावकर, दासु वैद्य, ललित अधाने, माधुरी चौधरी, प्रिया धारुरकर, रवी कोरडे, श्रीधर नांदेडकर यांच्या शिवाय अनेक भावकवी, वास्तववादी कवी यांच्यासारख्या साहित्यिकांच्या परंपरेचा प्रभाव जाणवतो. नव्या पिढीतील अनेक कवी ग्रामीण जीवन, सामाजिक परिवर्तन आणि मानवी संघर्ष यांचे विविध पैलू कवितेतून मांडत आहेत.

**निष्कर्ष**

२००० नंतरची मराठवाड्यातील मराठी कविता ही बदलत्या समाजाचे प्रतिबिंब आहे. ती दुष्काळ, शेतकरी, स्त्री, दलित, पर्यावरण, जागतिकीकरण आणि मानवी अस्तित्व यांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने स्पर्श करते. लोकभाषेचा आधार, सामाजिक भान आणि परिवर्तनाची आकांक्षा यांमुळे ही कविता समकालीन मराठी साहित्याला नवे परिमाण देत आहे. मराठवाड्याची कविता ही केवळ प्रादेशिक अनुभवांची अभिव्यक्ती नसून व्यापक मानवी मूल्यांची जपणूक करणारी साहित्यिक शक्ती आहे. ''मराठवाड्यातील समकालीन कविता ही वेदनेतून जन्मलेली आणि परिवर्तनाकडे वाटचाल करणारी संवेदनशील अभिव्यक्ती आहे.''

***

✍ विवेक दत्तात्रय जोशी
छत्रपती संभाजीनगर
मो.9850433178



# ती (ललित लेखन)



**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

आणि अशा वेळी मुक भावनांचा अथांग सागर,पण त्यातून ही एका संयमातून स्थिर होणारे मन नव्या क्षितिजाच्या शोधात वेळेच्या कालचक्रात हरवते. का कोण जाणे मंदिराच्या पायरीवरचा तो काळा कातळ जिद्द, चिकटीत अगदी स्थिर स्थितप्रज्ञ असाच जणू मंदिरातील घाटाचे ते प्रतिध्वनी सामावलेल्या त्या भिंती अन् दोन पायऱ्यांना जोडणारी ती पायरीवरची उभी चीर मनाच्या कुतूहलात वैशिष्ठ्यतः हरवणारी ती चीर मनाच्या तळाचा ठाव घेते.

कोणीतरी सुख दुःखाच्या आणाभाका सांगणारा तो देह हळूवार तिथे स्थिरावतो. वाहणाऱ्या त्या पाण्यातून नवी प्रेरणा घेत सकारात्मक मनाने परततो.अन् परमेश्वर चरणाशी गाऱ्हाणे सांगून नत मस्तक होऊन नीरामाईच्या काठावर विसावत वाहत्या त्या प्रवाहात मनातील सारे मळभ दूर वाटेवर हरवते.अन् तिच्या पदरातील तो उबदारपणा श्वासात भरून मार्गस्थ होणारी पाऊले अन् पाऊलखुणा नव्या मार्गावर मार्गस्थ होतात..

दोन्ही काठावर असलेली ती तृणपाती वाऱ्याच्या मंद झुळुक येता बावरलेली शहरलेली अन् त्यावर विसरणारा तो एक थेंब अगदीच पारदर्शक असा जणू एखाद्या आरश्याप्रमाणे. दोन्ही काठांना सखल समृद्ध करत दुरात धावणारी ती मनाचा ठाव घेत स्मरते.

©सौ. वैशाली महाडिक,
सातारा ९७६७४३७९२३



सलोखा, एकात्मता, सकारात्मकता त्याच्याही पुढे जाऊन मला एक वाटते, विश्वास, प्रेम अशी अनेक वलये त्या वाहत्या पाण्यात नितळ निर्मळ अगदी पारदर्शक अशीच जणू . नीरा माई चे चित्र पाहिल्यानंतर असे वाटले की मनापासून मनापर्यंत भिडलेले ऋणानुबंधाचे नाते निस्वार्थी प्रेम, जिव्हाळा, आपुलकी सकारात्मक वाटले.

जसे अथांग सागरातल्या असंख्य लाटा किनाऱ्याशी येऊन विसावतात. अन् तुषारातला तो एक थेंब पुन्हा सागराच्या पाण्यात विरघळतो असे झाले. दूर वाटा वाटांवर पांगताना उमटलेल्या त्या पाऊलखुणा अलगद मातीत विसावतात ना..! अन् मंद वाऱ्याची झुळूक येऊन पुन्हा नव्याने उमलतात ना अगदी असेच काही.

आधाराचा हात आणि जगण्याचे एक नवे बळ देऊन जाते. भावनेच्या त्या ओलाव्यात अलगद घरंगळणारे ते दोन आनंदाश्रू आपले पणाच्या नात्यात मूर्त रुपात विसावतात.

ऋणानुबंधाचे धागे जोडणारी अशी ती म्हणजे नीरा माई आयुष्याच्या वाटेवर येणारे खाच खळगे पार करत संथ गतीने वाहणारी तेजस्वी रूपात जणू जगण्याचं बळ आणि जगण्याचा एक नवा संदेश देऊन जाते.तेंव्हा आपोआप ओठांवर येते

संथ वाहते निरा
किती जीवांचा ती सहारा
तिच्यासाठीच्या आपुलकीचा
डोळ्याच्या कडातून झिरपतो किनारा.

# जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा

**ज्योतिर्मय साहित्य**

याच्या अंतर्गत या मालिकेतील ४९ वा भाग वाचून श्लोकाचा अर्थ व्यवस्थित समजण्यासाठी मदत झाली. समर्थ रामदास स्वामींच्या मनाचे श्लोक या अजरामर कृतीचे तुम्ही केलेले हे विवेचन अत्यंत सोप्या, मार्मिक आणि आजच्या काळाला धरून प्रगल्भ असे झाले आहे.

व्यावहारिक आणि सडेतोड उदाहरणे खूप छान! तुम्ही विवेचनामध्ये आजच्या समाजातील दुटप्पीपणावर जे बोट ठेवले आहे, ते अत्यंत अचूक आहे. शाळांचे माध्यम, लग्नातील हुंडा आणि अवास्तव खर्च यांसारखी आपल्या अवतीभवती घडणारी उदाहरणे देऊन तुम्ही ''सदा बोलिल्यासारीखे चालताहे'' हा कठीण वाटणारा विचार अगदी सहजपणे पटवून दिला आहे. यामुळे हे विवेचन केवळ तात्त्विक न राहता अंतर्मुख करणारे ठरते.

संतांच्या चरित्रातील अचूक दाखले देताना तुकाराम महाराजांची निरपेक्ष वृत्ती आणि छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी यांच्या भेटीचा, राज्य अर्पण केल्याचा प्रसंग



विवेचनाला ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वजन प्राप्त करून देतो. ''सोने रूपे आम्हां मृत्तिकेसमान'' ही वृत्ती संतांनी कशी जगली, हे या उदाहरणातून ठळकपणे समोर येते.

अनेकी एक या तत्त्वाचा सुंदर उलगडा केला आहे.

सामान्य माणसाची देवादेवांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद करण्याची जी वृत्ती असते, त्यावर तुम्ही गीतेतील श्लोकाचा (नद्या आणि समुद्राचे उदाहरण) संदर्भ देऊन केलेले भाष्य अत्यंत प्रगल्भ आहे. ''मंदिरात आणि अंतरात तोच नांदत आहे'' हे वाक्य मनाला स्पर्शून जाते. सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचा प्रवास किती सहज असावा, हे यातून स्पष्ट होते.

अत्यंत प्रभावी स्वसंवाद हा तर खूपच आवश्यक आणि आवडणारा भाग आहे.

लेखावर बोलू काही...
✍ विभावरी कुलकर्णी
पुणे मो. ८०८७८१०१९७



दरवेळेप्रमाणे याही भागात स्वसंवाद हा या लेखनाचा प्राण आहे. पाचही प्रश्न वाचकाला स्वतःच्या आरशात पाहायला लावतात. विशेषतः पहिला आणि दुसरा प्रश्न आजच्या धावपळीच्या आणि संभ्रमाच्या युगात प्रत्येकाने स्वतःला रोज विचारावेत असे आहेत. हा स्वसंवाद वाचकांना केवळ वाचक न ठेवता साधक बनवतो.

हा भाग अतिशय समतोल झाला आहे. यामध्ये उपदेशाचा डोस नाही, तर एका सहप्रवाशाने दुसऱ्या सहप्रवासाला दिलेली प्रेमाची साद आहे. लेखनशैली नेहमीप्रमाणेच ओघवती, समृद्ध आणि मराठी भाषेचे सौंदर्य खुलवणारी आहे.

आपली लेखनशैली आता चांगलीच परिचित झाली आहे.

पुढील भागांची उत्सुकता नक्कीच वाढवणारे हे लेखन आहे!

(क्रमशः ची प्रतीक्षा राहील!)

# शेतकरी आत्महत्या; चिंतेचा विषय, हा एक संकेत?

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

जी आपल्याच पुर्वजांनी भविष्याचा वेध घेवून लावली होती. आता काही ठिकाणची जंगलंही तोडलेली आहेत. तिही आता दिसत नाही. तसंच प्रत्येक मोठ्या मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला रांगेनं उभी असलेलीही झाडं दिसत नाही.

जी परिस्थिती गावात आहे. तीच परिस्थिती शहरातही आहे. शहरातही प्रत्येक घरी असणारं झाड आता नाही. रस्त्याच्या कडेला काल उभं असणारं झाड आज नाही. पावसाचं पाणी जरी आलं तरी ते मुरायला जागा नाही.

झाडं का तोडली गेली? झाडं तोडली नसती तर गावात आणि शहरातही पावसाचं येणारं पाणी मुरलं असतं. परंतु हे का घडलं? हा प्रश्न एकंदरीत सांगायचं झाल्यास झाडं गाव असो की शहर, कुठेच जास्त प्रमाणात दिसत नाही. ही परिस्थिती का आली? झाडं कमी का झाली? झाडं का तोडली गेली? कुणी तोडली? या सर्व प्रश्नांचं उत्तर आहे, आपल्या शहराचा विकास आणि त्याचबरोबर गावाचाही विकास. शहरात टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या व जाहिरात केल्या गेली की झाड जर अंगणात असेल तर सिमेंटच्या भींतींना तडा जातो. त्यामुळंच कोणीही आपल्या अंगणात झाड लावत नाहीत. तसंच होती, तिही झाडं तोडली. लोकं एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या अंगणात अंगणातील जागा स्वच्छ व चांगली दिसावी म्हणून सिमेंटीकरण केलं. त्यानंतरही लोकं थांबले नाहीत. त्यांनी आपल्या अंगणासमोरील रस्ता चांगला दिसावा म्हणून रस्त्याचं सिमेंटीकरण केलं. त्यामुळंच आता शहरात कुठंच पावसाचं पाणी मुरायला जागा शिल्लक नाही. राहिला गावचा प्रश्न. तर गावातही आता सिमेंटची घरं झालेली असून घराच्या भींतींना तडा जातो म्हणून प्रत्येक घरासमोर असलेली झाडं तोडलेली आहेत. वडाच्या झाडाची मुळं खुप दूरवर जातात व ती मुळं घरांना क्षती पोहोचवितात, म्हणून तिही तोडलेली आहेत. गावाच्या प्रवेशद्वारावर असलेली चिंचेची डेरेदार झाडं तुटलेली आहेत नव्हे तर तोडलेली आहेत. कारण त्या रस्त्याचं सिमेंटीकरण झालं. शहरालगत जोडलेल्या रस्त्यावर, रस्त्याच्या दोन्ही कडेला असलेली झाडं तोडलेली आहेत. कारण रस्ते मोठे झाले. शिवाय गावातील आमराईही तोडलेली आहे. कारण तिथं भुतं वसतात. ही अंधश्रद्धा.

पुर्वी शेतातही झाडं असायची. आता तिही दिसत नाहीत. कारण झाडाच्या सावलीत पीक होत नाही. असं शेतकऱ्यांचं म्हणणं. शेतातही



पुर्वी संत्रा, मोसंबी, आंबे, पेरु यांची झाडं असायची. आता तिही नाहीत. कारण त्या झाडाला पाहिजे तेवढी फळं लागत नाही. फळ लागत नाही. कारण प्रदुषण. गावाच्या बाहेर अनेक कारखाने उभे राहिले आहेत की ज्या कारखान्यातून प्रदुषीत हवा बाहेर पडते. त्यात कारखान्यातून निघणाऱ्या धुळीचे कण असतात. जे विषारी वायूचे कण असतात. जे पिकांवर बसतात. ज्यातून मोठमोठ्या झाडांना अपाय होतो व त्यांची फलोत्पादन देण्याची क्षमता कमी होते. एवढंच नाही तर कारखान्यातून निघणाऱ्या सांडपाण्यातही कारखान्यातून निघणाऱ्या विषारी वायूचे कण असतातच. ते पाणी पावसाळ्यात नाल्यानं वाहात असतांना त्याचं विघटन होवून ते कण वायुरुपानं पिकांपर्यंत पोहोचतात. ज्यातून पिकांची रोगप्रतिकारक शक्ती व उत्पादन शक्ती कमी होते. त्यातच या कारखान्याचा परिणाम दूरदूरपर्यंत पिकांना होतो. म्हणूनच गावातील शेतीत असलेली फळांची झाडं, ती झाडं पुरेसं उत्पादनच देत नसल्यानं तोडण्यात आली. आता गाव असो की शहर असो, झाडं विपूल प्रमाणात दिसत नाहीत. ज्यातून पाऊस येत नाही. आलाच तर सिमेंटीकरणानं व झाडं कमी झाल्यानं ते पाणी जमीनीत मुरत नाही. राहिला पिकांच्या उत्पादनाचा भाग. तर आज पिकांचं उत्पादनही बरोबर होत नाही. शिवाय जो शेतकरी एवढ्याही कठीण परिस्थितीत आपल्या शेतात पीक पिकवतो. त्यालाही सन्मान नाही. सन्मानदर्शक दोन प्रेमाचे शब्द नाहीत. त्यामुळं निश्चितच आत्महत्या.

✍ अंकुश शिंगाडे
नागपूर ९३७३३५९४५०

या सर्व बाबी. या आत्महत्या. ही झाडं तोडणं. हे सिमेंटीकरण. हे प्रदुषण. याला जबाबदार कोण? खरंच या गोष्टीला विकास म्हणता येईल काय? आम्ही एकीकडं विकास केला. असं आपलं म्हणणं तर दुसरीकडे आपली अधोगती होत आहे. परंतु आफण फक्त विकास पाहतो. अधोगती विचारात घेत नाही. खरंच शहरात आणि गावात सिमेंटीकरण झालं. दोनचार मजली इमारती उभ्या राहिल्या म्हणजे देशाचा विकास होत नाही. विकास त्यालाच म्हणता येईल, जर पाऊस येत असेल. शेतकरी आपल्या शेतात विपूल प्रमाणात धान्य पिकवीत असतील. रस्त्यावर, गल्लीगल्लीत झाडं दिसतीत. जंगलं असतील व तेथेच वन्यप्राणी सुरक्षीत असतील. ते शेतात वा गावात भटकणार नाहीत. शिवाय कारखानेही सुजलाम, सुफलाम गावाच्या लगत नसतील. ते गावाच्या दूर अशा ठिकाणी म्हणजेच टेकडीवर की जिथं पीक पीकत नाही. अशा ठिकाणी असतील.

आज शेतकरी आत्महत्या होवू लागलेल्या आहेत. हा एक संकेत आहे, उद्याच्या भविष्याचा. काळ सांगत आहे व सुचना देत आहे की ज्याप्रमाणे मोहेंजोदारो, हडप्पा या सुसंपन्न संस्कृतीचा विनाश झाला. तसाच विनाश आता होवू शकतो.

विनाश...... होय. ही खरी गोष्ट आहे व याचे संकेत आज दिसू लागले आहेत. तेही शेतकरी आत्महत्येवरुन लक्षात येत आहेत.

शेतकरी आत्महत्या होत आहे. कारण आता पाहिजे त्या प्रमाणात शेती पीकत नाही म्हणून. शेतकरी आत्महत्या होत आहे. कारण पावसाचं पाणी पुरेसं येत नाही म्हणून. पावसाचं पाणी येत नाही. कारण झाडं नाहीत म्हणून. ती तोडली गेली म्हणून. तसं पाहिल्यास शेतकरी वर्गाचं जीवन अतिशय धोकादायकच. अलिकडील काळात जंगलं तोडल्यानं त्यांना जंगलातील हिंस्र प्राणी शेतात शिरल्यानं धोका होतो. दुसरा धोका, रात्री अपरात्री शेताला पाणी देत असतांना चावणाऱ्या सापासारख्या प्राण्यानं. तिसरा धोका शेतात वीज पडत असल्यानं, त्यात सापडल्यावर. हे झालं शेतकरी मरण.

हडप्पा, मोहेंजोदारो सारखी सुसंपन्न शहरं का नष्ट झाली? या कारणांचा शोध घेतल्यास कोणी म्हणतील की सिंधू, झेलम नदीला पूर आल्यानं ती शहरं नष्ट झाली. कारण ती शहरं याच नदीच्या काठावर वसली होती. दुसरं उत्तर असतं की त्याही काळात पाऊस पडला नसेल की ज्यानं तेथील माणसं मरण पावली व ती शहरं नष्ट झाली. तिसरं कारण आहे की भुकंपानं वा रेतीच्या प्रवाहात ती शहरं गाडली गेली असावीत. असो, तो आपला भाग नाही. परंतु सध्या त्याच आधारावरुन विचार केल्यास आपल्याला आज जाणवतं की आज सिमेंटीकरणानं व देशाच्या विकासाची स्वप्न पाहात असतांना जो आम्ही विकास केला. त्या विकासासाठी आज आम्ही झाडं तोडली. आज आमच्याकडे पाऊस वेळेवर पडत नाही. उष्णतामान वाढलंय. त्यातच वातावरण बदललंय. हा एक संकेतच आहे, आमची विकासाच्या नावावर सुसंपन्न असलेली संस्कृती नष्ट करण्याचा. खरंच आज जर आम्ही सुधारलो नाही व पावलं उचलली नाहीत. तर उद्या तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी आमची सुसंपन्न, सुसंस्कृत असलेली संस्कृती एका झटक्यात नष्ट होईल. यासाठी आजच सावध झालेलं बरं. यात शंका नाही.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559